# ६. नम्मया-सुंदरीए चउरत्तणं

पुरुष असो की स्त्री प्रत्येकाला आपले चारित्र्य अत्यंत प्रिय असते. त्याच्या रक्षणासाठी प्रत्येक स्त्री-पुरुष हे सतत दक्ष असतात. एवढेच नव्हे तर आपल्या चारित्र्यरक्षणासाठी स्वतःचे प्राणही दिलेले आढळून येतात. मग एखाद्या लहान-मोठ्या संकटाचे, कष्टाचे त्यांना काहीच वाटत नाही. कारण कलंकित, अपमानित जीवन जगणे त्यांना कठीण होते, त्यामुळे त्यांना मरण सुखकर वाटते.

परंतु आज चारित्र्यापेक्षाही मान, सन्मान, संपत्ती, सत्ता इत्यादीला अधिक महत्त्व प्राप्त झाल्याने चारित्र्याकडे दुर्लक्ष होत आहे. अपमानित, कलंकित जीवन जगण्यातच श्रेष्ठत्व मानले जात आहे. त्यामुळे समाजात भ्रष्टाचार, लुटालुट इत्यादीसारख्या गैरमार्गाचा अवलंब करून विविध सुखसोयी उपभोगल्या जात आहेत. त्यामुळे नैतिक मर्यादांचा ऱ्हास होत आहे. म्हणून प्रत्येकाने चारित्र्ययुक्त सन्मानित जीवन जगण्याचा प्रयत्न करावा.

या पाठातील नर्मदासुंदरी ही विविधप्रकारची दुःखे व संकटे सहन करत आपले चारित्र्य रक्षण कसे करते ते या पाठात स्पष्ट केलेले आहे. राजाची राणी होण्याची संधी प्राप्त होऊनही आपल्या चातुर्याने व मोठ्या कष्टाने नर्मदासुंदरी आपल्या चारित्र्याचे रक्षण करते. तेव्हा प्रत्येकाने तिचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चारित्र्य संपन्न जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे यातून स्पष्ट केलेले आहे.

सदर पाठ महेंद्रसूरींनी लिहिलेल्या 'नम्मया-सुंदरी-कहा' या प्राकृत कथा ग्रंथातून घेतलेला आहे.



अन्नया नम्मयासुंदरीए रुव-वण्णणं सुणिऊण राइणा पेसिओ दंडवासिओ। दंडवासिओ नम्मयाए गिहं आगओ। परियणेण कया तस्स पडिवत्ती। पुच्छिओ य किं आगमणं पओयणं? दंडवासिएण भणियं, 'रन्ना तुह दंसणुक्कंठियं ममं आइट्ठो हरिणीए ठाण-ट्ठवियं राणियं सिग्घं आणेहि' ता तुरियं कीरउ गमणेण पसाओ। तओ नम्मयाए भणियं, 'अहं

जं इच्छामि तं चेव तुमए मज्झ आइट्ठं'। मम पुण्णइं अत्थि तेण संभरिया इंदसेण राइणा।

करिणीए भणियं 'सुंदरं एयं, पज्जंतु मणोरहा'। नम्मयाए भणियं 'सलक्खणा ते जीहा'। एरिसं आसीवायं मम दिज्जाहि' त्ति भणंतीए दंडवासिओ उवणीया सिविया आरूढा चलिया नयराभिमुहं। अंतराले घडिजंतं वहमाणं दट्ठूण नम्मया भणियं दंडवासिअं, 'तन्हाइया अहं उत्तारेह मं जेण एत्थ सहत्थेण पाणियं पियामि'। तओ 'जं आणवेसि' त्ति भणंतेण उत्तारिया दंडवासिएण, पत्ता विमल-जल-भरिय-सारणिं।

तत्थ पाऊण पाणियं कुहिय-चेक्कण-जंबाल-भरिय-खड्डाए लद्धावसरा फेल्हुसण-मिसेण झड त्ति निवडिया खड्डाए। खड्डाए उवरिं आगच्छिऊण अट्टाहासाए पुव्वं भणिया, 'अहो! राइणा मं एयं आभरणं पेसियं ति भणंतीए सव्व सरीरं लिपियं कुहिय-चेक्कणं।

एत्थंतरे 'हा सामिणि! किं एयं?' त्ति भणमाणो समुह-आगच्छंतो दंडवासिओ। अहो! गहो त्ति कओ जणेण कोलाहलो। विगराली-कय-लोयणा निल्लालिय-जीहा सिवारवं कुणंति पहाविया जणसमुह-समुहं, 'अहो! रायभारियं गहिल्लं उल्लवह त्ति संचल्लह रायउलं जेण दंसेमि दुब्भासिय-फलं'।

एवं अलजालई पलवंतीए दंडवासिओ राय-सगासं साहिउं पयत्तो, 'देव, सच्चं एयं सावराई सयमेव देव-संगम-उसुया मम विन्नवियं सोऊण बहलं रोमंच-कंचुयं तुरियं कय-सिंगारं मम वयणेण समारूढा सिबियं ति।

तीए दट्ठूण लोगा चिंतन्ति, 'एसा पच्चक्खा लच्छी, एसा विय रंभा, एसा च्चिय तिलोत्तिमा, णही णही एसा मयण-घरणि' त्ति। मए वि चिंतिउं लग्गो 'एए देवाउ इत्थीए थोवं थोवं रूव-लायण्णं घेत्तूण महारायस्स कए एसा विहिणा निम्मविय त्ति। महाराय! ण जाणामि किं तीए चक्खु-दोसो! किल जलं पियंतीए उत्तेडियं किं पि? खड्डा-तीरेण गच्छंति धस त्ति निवडिया विगंधे जंबाल-मज्झे। तओ गह-गहिया इव आयरणं करेइ'।

तं सुणिऊण राइणा संभंतेण भणिओ, 'गच्छ, गच्छ सिग्घं ति। तिहुयण-भूयवाइयं आणेहि। अहं पि तीए समीवं गच्छामि। तओ दंडवासिएण समाहूओ चेव आगओ तिहुयणो भूयवाइओ। रन्ना भणिओ, 'निरूवेहि को एस गहो? केण-उवाएण नियत्तइ'। सुचिरं परिभाविऊण संलत्तं तिहुयणो 'महाराय-संगम-पाविऊण ताणं उप्पज्जइ। मंत-तंताणं एयस्स इच्छाभंगो न कायव्वो। एसा जं मग्गइ तं चेव दिज्जइ, न य चंकारिज्जइ त्ति तओ कालेण सयमेव उवसमइ त्ति'।

तओ नम्मया-सुंदरीए भागधेय-चोइएण भूयवाइएण भणिएण रन्ना उग्घोसावियं नयरे, 'जो एयाए राय-वल्लहाए गरूए अवराहे कए वि, को वि तीए मंगुलं भणिस्सइ करिस्सइ वा तं अहं महादंडेण दंडिस्सामि' त्ति। तम्मि वेलाए नम्मया-सुंदरी जणस्स पच्चय-हेउं गह-चेट्ठिय पयासेइ। चेक्खलं दट्ठूण पुणो पुणो सव्वंगं लिंपइ। सीसे कयावि छारं खिवइ। दिणम्मि नयरे भमइ रत्तिं देउले गंतुं नियजीवं भणइ-



**'रे जीव! मा किलम्मसु एयाए लज्जणेज्ज-किरियाए।**
**जं च्चिय सहिंति दुक्खं ति तं च्चिय सुह-भायणं होन्ति।।**
**सीलरयणं महग्घं किच्छेण वि जइ तरिज्ज रक्खेउं।**
**ता होज्ज मज्झ तुट्ठी तिहुयण-रज्जोवलंभे व्व।।**

एवं पयारे नम्मया-सुंदरीए निय-सील रयणस्स रक्खणं कया। तं जाणिऊण सव्वे जणा वि निय-सील-रयणस्स रक्खणं करियव्वं।

**अलजालई** – खोटे, दोषारोपाचे
**अंतराले** – मार्गामध्ये
**अट्टहासाए** – अट्टाहासाने, आग्रहाने
**असज्झो** – असाध्य, बरे न होणारा
**अवराहे** – अपराध
**आइट्ठो** – आदेश, आज्ञा, हुकूम
**आणावेसि** – आज्ञेप्रमाणे, हुकुमाप्रमाणे
**इव** – प्रमाणे, सारखे, समान
**उवणीय** – उपस्थित होणे, आणलेले
**उवसमइ** – शांत होणे, व्यवस्थित होणे
**उल्लवह** – बोलणे, म्हणणे
**उसुया** – उत्सुक, आतुर, उत्कंठीत होणे
**उत्तेडिया** – उत्तेजित, उन्मत्त झाल्याने
**एरिसं** – अशाप्रकारे
**पओयणं** – प्रयोजन, कारण, हेतू, उद्देश
**मा** – नको, पुरेसे होणे
**मयण–घरिणी** – मदनाची गृहिणी, रती
**राया–भारियं** – राजाच्या पत्नीस, राणीस
**रोमंच, कंचुयं** – आनंदित, रोमांचित होणे
**वराई** – बिचारी
**विहिणा** – विधीने
**विगराली** – विक्राळ, मोठे करणे
**कओ** – केले
**करिणीए** – स्त्रीचे नाव, कार्य करणारी
**किलम्मसु** – किल्मिष, दुःख, कष्ट
**किला–विज्जंतो** – क्रीडा, क्रिया करत असताना
**कोलाहलो** – कोलाहल, गोंधळ
**कए** – करिता, साठी
**कुहिय–चेक्कण** – दुर्गंधीयुक्त चिखलाने
**पहाविया** – धावणे, पळत जाणे
**परिभाविऊण** – विचार करून
**पच्चय, पच्चक्ख** – प्रत्यक्ष, समक्ष
**पयासेइ** – प्रकट करते
**पयत्तो** – प्रवृत्त होते, प्रारंभ करते
**पलवंतीए** – बोलण्याचे, बडबडण्याचे
**पियंतीए** – पिल्याने
**पज्जंतु** – पूर्ण होणे
**फेल्हुसण–णिसेस** – पाय घसरल्याच्या निमित्ताने
**बहल** – पुष्कळ, अतिशय
**भायणं** – सहभागी
**भागधेय** – भाग्याने, नशिबाने
**भूयवाइ** – भूतवादी
**महग्घं** – महाग, मौल्यवान
**मंगुल** – वाईट, अशुभ
**किच्छेण** – कष्टाने
**खिवइ** – टाकतो, फेकतो
**घडिजंतं** – रहाट यंत्र
**गह–गहिया** – भूतबाधा होणे
**गह–चेट्ठिया** – ग्रहबाधा, बुद्धिभ्रष्ट
**गहिल्ल** – ग्रहबाधा, बुद्धिभ्रष्ट
**चेट्ठइ** – राहतो
**चेक्खल्ल** – चिखल
**चंकारिज्जइ** – इलाज, उपाय
**चक्खुदोसे** – चक्षू दोषाने, न दिसणे
**चोइएण** – चेतविणे, प्रभावाने
**छार** – राख, धूळ, माती
**जंबाल** – चिखल
**जीहा** – जीभ

**तण्हाइया** – तहानलेली

**तुरियं तुरियं** – ताबडतोब

**तुट्ठि** – आनंद, संतुष्ट होणे

**दुब्भासिय** – अशुभ, वाईट बोलण्याचे

**तिहुयणा** – त्रिभुवन, व्यक्तीचे नाव

**धणियं** – अधिक, पुनःपुन्हा

**निवडिया** – पडले

**निल्लालिया** – बाहेर काढली

**सगास** – जवळ

**साहिउं** – सांगण्यासाठी

**सलत्तं** – बोलणे

**सहिंत** – सहन करीत

**संचल्लह** – चालणे, जाणे

**सारणि** – जलप्रवाह, ओढा

**समाहुओ चेव** – येताच, बोलविताच

**संभारिया** – आठवण, स्मरण

**सलक्खणा** – शुभलक्षणी

**सिग्घं** – शीघ्र, ताबडतोब

**सिविया** – शिबिका, मेणा, डोली

**सिवारव** – मोठ्याने ओरडते

**वाहमाण** – चालू असलेले

## कृती

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(i) इंद्रसेन राजाने कोणास; कोणाकडून निरोप दिला?

(ii) नर्मदासुंदरीने शीलरक्षणासाठी कोणत्या उपायाचा अवलंब केला?

(iii) इंद्रसेन राजाने भूतवादी वैद्यास का बोलावले? वैद्याने काय सांगितले?

(iv) इंद्रसेन राजाने नर्मदासुंदरीच्या शीलरक्षणासाठी अप्रत्यक्ष कसे सहकार्य केले?

**2. कोणी कोणास म्हटले ते स्पष्ट करा.**

(i) 'हरिणीच्या पदावर जिची नेमणूक झाली तिला घेऊन या.' -----------

(ii) 'मी ज्याची इच्छा करत होते तिच तुम्ही आज्ञा देत आहात.' -----------

(iii) 'माझे पुण्य म्हणूनच इंद्रसेन राजास माझी आठवण झाली असावी.' ---------

(iv) 'मला तहान लागलेली आहे; मला खाली उतरवा.' -----------

(v) 'ताबडतोब जाऊन भूतवादी वैद्यास घेऊन या.' -----------

(vi) 'जे दुःख सहन करतात तेच सुखाचे भागीदार होतात.' -----------

**3. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(i) इंद्रसेन राजाने दंडाधिकाऱ्यास कोणती आज्ञा दिली?

(ii) नर्मदासुंदरीने स्वतःच्या अंगास चिखल लावून का घेतला?

(iii) इंद्रसेन राजाने त्रिभुवन भूतवादी वैद्यास का बोलावून घेतले?

(iv) इंद्रसेन राजाने आपल्या राज्यात कोणती घोषणा केली?


(v) नर्मदासुंदरी देवालयात जाऊन स्वतःस कोणता बोध देत होती?

(vi) 'नर्मदासुंदरीचे चातुर्य' हा पाठ कोणत्या ग्रंथातून घेतलेला आहे?

4. **जोड्या जुळवा.**

| (अ) | (ब) |
|---|---|
| 1) इंद्रसेन | (i) गणिका |
| 2) करणी | (ii) राजाचा सेवक |
| 3) नर्मदासुंदरी | (iii) नगराचा राजा |
| 4) दंडाधिकारी | (iv) चारित्र्यसंपन्न स्त्री |

5. **आकृती पूर्ण करा.**




6. **समानार्थी शब्द लिहा.**

(i) गिहं →

(ii) जलं →

(iii) लोयणं →

(iv) सरीरं →

7. **उपक्रम :**

(i) चारित्र्यसंपन्न स्त्री म्हणून नर्मदासुंदरीचे व्यक्तिचित्रण लिहा.

(ii) इंद्रसेन राजाचे व्यक्तिचित्रण करा.